**नियमित फौजदारी खटला क्र.४१०/२०२२**

**निशाणी क्रमांक — ६१**

**दोषारोपापूर्वीचा पुरावा**

**फिर्यादी पक्षातर्फे सा.क्र.५**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की,**

**नाव- राजश्री किरणकुमार नाळे, वय- ४५, धंदा- डॉक्टर,**

**व्यवसायाचा पत्ता - दिशा सायकॅट्रीक क्लिनिक, लक्ष्मीनगर, फलटण शहर, ता.फलटण, जि.सातारा.**

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र.५ चा सरतपास फिर्यादीच्या वतीने विधीज्ञ श्री. व्ही. एम. महाजन यांच्यामार्फत शपथेवर सुरु –**

माझे शिक्षण एम.बी.बी.एस. व डी.पी.एम. (पुणे) असे झालेले आहे. मी मनोविकार तज्ञ व मानसोपचार तज्ञ आहे. माझे क्लिनिकचे नाव दिशा सायकॅट्रीक क्लिनिक आहे. मी पुजा मंगेश जगताप या पेंशटची ट्रिटमेंट केलेली आहे. ती दि.२५.०४.२०१९ रोजी पहिल्यांदा माझ्या क्लिनिकमध्ये उपचारासाठी आली होती. सदर पेंशटच्या तपासणीमध्ये तिला बायपोलर मुड डिसऑर्डरची लक्षणे असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर तिला मी त्या अनुषंगाने वैद्यकिय उपचार घेण्याचा सल्ला दिला व तिला औषाधोपचार सुरु केले. त्यानंतर तिने माझ्याकडे दोन–दोन महिन्यांच्या अंतराने एक वर्षे उपचार घेतले.

२. मी तिला सुरु केलेले औषधे बाहेरुन मेडिकल मधून घेण्यासाठी माझे क्लिनिकचे लेटरहेडवर औषधांची चिठ्ठी लिहून दिलेली होती. आता मला दि.२५.०४.२०१९ रोजी मी तिला लिहून दिलेले औषधांची यादी दाखविली.

त्यानंतर ती पुन्हा माझ्याकडे आलेल्या प्रत्येक तारखांची औषधांची यादी देखील त्यात लिहिलेली आहे. सदर पेंशट माझ्याकडे दि.२५.०४.२०१९ नंतर दि.०३.०६.२०१९, दि.२६.०६.२०१९, दि.२०.०८.२०१९, दि.२६.०८.२०१९, दि.२४.०९.२०१९, दि.१२.१२.२०१९, दि.२२.०४.२०२०, दि.०७.०७.२०२०, दि.१६.०९.२०२० व दि.१८.०१.२०२१ रोजी आलेली होती. त्यादिवशी दिलेल्या औषधांची यादी माझ्या सहीनिशी त्यात नमुद आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (सदर औषध यादीस **नि.क्र.६२** देण्यात आला.). त्याव्यतिरिक्त दि.०९.१२.२०२२ रोजी व दि.२८.०६.२०२३ रोजी देखील सदर पेंशट माझ्याकडे उपचारासाठी आली होती.

३. सदर पेंशटला दिलेल्या औषधांमध्ये मुड स्टॅबिलाईझर व अॅटीसायकॉट्रीक हे मुख्य घटक होते. सदर पेंशटला बायपोलर मुड डिसऑर्डर या आजाराची क्षमतेपेक्षा व गरजेपेक्षा जास्त बोलणे, झोपेची गरज कमी होणे, चिड–चिड करणे व खूप अस्वस्थ राहणे अशी लक्षणे दिसत होती. सदर पेंशटने माझ्याकडे घेतलेल्या उपचारादरम्यान तिला बायपोलर मुड डिसऑर्डर या आजाराची लक्षणे असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर पेंशट माझ्याकडे उपचार घेत असल्याचे कालावधीमध्ये सप्टेंबर, २०२० मध्ये तिचा पती माझ्या क्लिनिकमध्ये आला व कोर्ट केसेच्या अनुषंगाने त्याच्या पत्नीच्या आजारपणाबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे असे सांगितलेनंतर मी दि.२०.०९.२०२० रोजी माझे क्लिनिकचे लेटरहेडवर त्याला प्रमाणपत्र दिले. आता मला ते प्रमाणपत्र दाखविले. त्यावर माझी सही व माझ्या क्लिनिकचा शिक्का आहे. सदर प्रमाणपत्रातील मजकूर सदर पेंशटला दिसलेल्या आजाराच्या अनुषंगाने मी केलेल्या निदानाप्रमाणे नमुद केलेला आहे. (सदर प्रमाणपत्रास **नि.क्र.६३** देण्यात आला.). सदर पेंशटच्या पतीने माझ्याकडून दोनवेळी त्याच्या पत्नीच्या आजारपणाचे प्रमाणपत्र घेतले होते. आजरोजी मला

दाखविलेले वरील प्रमाणपत्राव्यतिरिक्त अजून एक प्रमाणपत्र तिच्या पतीने माझ्याकडून घेतले होते.

सरतपास पुर्ण

**<u>आरोपी क्र.१ ते ७ चे वतीने विधीज्ञ पी. पी. जाधव यांच्यामार्फत साक्षीदाराचा उलतपास सुरु</u>**

४. सदर प्रमाणपत्र मागणीसाठी पेंशटच्या पतीने पोलीसांकडून काही पत्र वगैरे आणले होते किंवा कसे ते मला आता आठवत नाही. तिच्या पतीने सदरचे प्रमाणपत्र निश्चित कोणत्या केसच्या अनुषंगाने घेतले होते ते मला सांगता येणार नाही. साक्षीदार सांगते की, दि.०१.०२.२०२२ रोजी पोलीस ठाणे फलटण ग्रामीण व तिच्या पतीच्या विनंतीवरुन मी प्रमाणपत्र तिच्या पतीकडे दिले होते. साक्षीदार सांगते की, दि.०१.०२.२०२२ रोजी मी दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत मला सांगितल्यास मी दाखल करु शकते.

**आरोपीचे विधीज्ञ यांनी त्यांच्या वतीने सदर साक्षीदाराचा उर्वरित उलटतपास दोषारोपाची निश्चिती होईपावेतो राखून ठेवण्यात येत आहे. सबब, सदर साक्षीदाराचा उलटतपास दोषारोप निश्चितीपर्यंत राखून ठेवण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृती.

**स्थळ :** फलटण. सही xxx

**दिनांक:** ०४.११.२०२३ **(एस. एन. थापेकर)**

सदर जबाब मी टंकलिखित केला. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.५

सही xxx फलटण.

**(पी. एस. लाळगे)**

लघुलेखक, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग व

दिवाणी न्यायालय, फलटण